## भौगोलिक स्थान व सीमा :-

महाराष्ट्र राज्याच्या नकाशात **औरंगाबाद जिल्हा** पश्चिम भागात आहे. औरंगाबाद जिल्हयाच्या पूर्व दिशेस जालना जिल्हा आहे. उत्तरेस जळगाव हा जिल्हा आहे. पश्चिम दिशेला नाशिक व अहमदनगर जिल्हा आहे तर दक्षिणेस बीड जिल्हा आहे. औरंगाबाद जिल्हा 19 18‘ व 20 40‘अक्षांश दक्षिण 74 40‘ व 76 40‘ रेखांश स्थीत आहे.

## भौगोलिक रचना :-

गोदावरी नदीच्या खो-याचा बहुतेक भाग सपाट मैदानाचा आहे. जिल्हयात म्हैसमाळ-वेरुळ, आहेत. अजिंठा डोंगर आहेत. भूरुपाच्या उंचसखलपणावरुन प्राकृतीक रचना समजते. जिल्हयाचे प्राकृतीक रचनेनुसार दोन विभाग पडतात.

## प्राकृतीक विभाग-

**म्हैसमाळ टेकडी प्रदेश :-** खुलताबाद तालुक्यात म्हैसमाळ-वेरुळ गावात टेकडया त्या गावांच्या नांवावरुन ओळखल्या जातात. म्हैसमाळ हे थंड हवेचे ठिकाण म्हणुन ओळखल्या जाते. या प्रदेशात खुलताबाद या तालुक्यात आहे.

**गोदावरी नदीचे सखल मैदानः-** औरंगाबाद जिल्हयाचा बराच भाग या मैदानी प्रदेशात येतो. गोदावरी नदी आणि त्यांच्या उपनदयामुळे हा प्रदेश सपाट व सुपीक बनला आहे.

**अजिंठा डोंगराळ प्रदेश :-** अजिंठा डोंगराळ भाग जिल्हयात उत्तरेस आहे. या प्रदेशात सोयगांव तालुक्यात येतो.

**औरंगाबाद जिल्हयाचे हवामान :-** औरंगाबाद जिल्हयाचे हवामान सर्वसाधारणपणे उष्ण व कोरडे आहे. पावसाळयात दमट असते. उन्हाळयात तापमान जास्त असते 38.0 ते 42.0 डिग्री सेल्सेस तापमान असतो. औरंगाबाद जिल्हयात पावसाचे प्रमाण जास्त नसुन 8 ते 10 वर्षातुन एकदा जास्त पावसाळा होतो. माहे ऑगस्ट व सप्टेंबर मध्ये जास्त पाउस पडतो. सिल्लोड, सोयगांव, कन्नड व खुलताबाद इत्यादी तालुक्यात पाऊस जास्त पडतो.

**प्रशासकीय विभाग :-**औरंगाबाद जिल्हा औरंगाबाद महसूली विभागात येत आहे. प्रशासकीय कामाच्या दृष्टीने (3) उप विभाग असून एकुण (9) तालुके आहे

**जिल्हा-औरंगाबाद**

| अ.क्र. | उपविभाग | तहसिलचे नांव | | |
|---|---|---|---|---|
| 1. | औरंगाबाद | 1) औरंगाबाद | 2) पैठण | 3) फुलंब्री |
| 2. | वैजापूर | 1) वैजापूर | 2) गंगापूर | 3) खुलताबाद |
| 3. | सिल्लोड | 1) सिल्लोड | 2) कन्नड | 3) सोयगांव |

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | महानगर पालीका | - | 01 |
| 2. | नगरपालिका | - | 06 |
| 3 | गट | - | 9 |

4. ग्रामपंचायती - 852

## जिल्हयातील पर्जन्यमान

विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे अतिवृष्टीमुळे जिल्हयांतील गोदावरी नदीला पावसाळयांत 10 ते 12 वर्षातुन एक वेळेस पूर येतो. औरंगाबाद जिल्हयात जुलै-2005, ऑगस्ट-2006 मध्ये अतिवृष्टी होती. 2007 मध्ये 583.98 मि मि पाउस पडला होता. नाशिक जिल्हयातील गंगापूर धरण मधुन पाणी गोदावरी नदीला व जायकवाडी धरणातील सांडव्याद्वारे पाणी सोडल्यामुळे पूर परिस्थिती निमार्ण झाली होती. जिल्हयात सरारसरी पर्जन्यमान 623.59 मि मी पडतो. मागील 10 वर्षाचा पडलेला सरासरी पाउस खालील प्रमाणे आहे.

| अ क्र | वर्ष | माहे जुन ते ऑक्टोबर पर्यंत प्रत्येक्ष पडलेला एकुण पाउस (आकडे मि मि मध्ये) | सरासरी |
|---|---|---|---|
| 1 | 1999 | 5981.30 | 664.60 |
| 2 | 2000 | 4969.90 | 552.30 |
| 3 | 2001 | 5457.20 | 606.40 |
| 4 | 2002 | 5604.80 | 622.76 |
| 5 | 2003 | 4941.60 | 549.07 |
| 6 | 2004 | 5598.80 | 622.09 |
| 7 | 2005 | 4723.90 | 524.88 |
| 8 | 2006 | 7993.90 | 888.21 |
| 9 | 2007 | 5255.81 | 583.98 |
| 10 | 2008 | 5792.21 | 643.58 |

## पुनर्वसन करावयाच्या गावांची यादी :-

| अ. क्र. | तालुका | बाधीत गावाचे नांव | पुनर्वसन पुर्णत: अंशत: | गावातील एकुण कुटुंबाची संख्या | एकुण बाधीत कुटुंबाची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **पैठण** | तेलवाडी | पुर्णत: | 72 | 72 |
| 2 | | दादेगाव जहागीर | पुर्णत: | 439 | 439 |
| 3 | | वडवाडी | पुर्णत: | 469 | 469 |
| 4 | | मायगाव | पुर्णत: | 296 | 296 |
| 5 | | नायगाव | पुर्णत: | 296 | 296 |
| 6 | | वाघाडी | अंशत: | 231 | 44 |
| 7 | | चनकवाडी | अंशत: | 135 | 6 |
| 8 | | पाटेगाव | अंशत: | 465 | 71 |
| 9 | | आपेगाव | अंशत: | 990 | 230 |
| 10 | | हिरडपुरी | अंशत: | 704 | 140 |
| 11 | | नवगाव | अंशत: | 834 | 159 |
| 12 | | टाकळी अंबड | अंशत: | 412 | 31 |
| 13 | | पिंपळवाडी पिराची | अंशत: | 1575 | 29 |
| 14 | | कावसान | अंशत: | 121 | 111 |
| | | **एकुण** | | **7039** | **2393** |

| अ. क्र. | तालुका | बाधीत गावाचे नांव | पुनर्वसन पुर्णत: अंशत: | गावातील एकुण कुटुंबाची संख्या | एकुण बाधीत कुटुंबाची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **वैजापूर** | नांदुरढोक | पुर्णत: | 204 | 204 |
| 2 | | बाभुळगांव गंगा | पुर्णत: | 165 | 165 |
| 3 | | लाखगंगा | पुर्णत: | 176 | 176 |
| 4 | | पुरणगाव | पुर्णत: | 290 | 290 |
| 5 | | बाबतारा | पुर्णत: | 291 | 291 |
| 6 | | अव्वलगाव | पुर्णत: | 347 | 347 |
| 7 | | चेंडुफळ | पुर्णत: | 169 | 169 |
| 8 | | बाजाठाण | पुर्णत: | 178 | 178 |
| 9 | | देवगावशनी | पुर्णत: | 176 | 176 |
| 10 | | वांजरगाव | अंशत: | 245 | 110 |
| 11 | | सावखेडगंगा | अंशत: | 260 | 38 |
| 12 | | डोणगाव | अंशत: | 262 | 98 |
| 13 | | डागपिंपळगांव | अंशत: | 360 | 60 |
| 14 | | चांदेगाव | अंशत: | 240 | 21 |
| 15 | | नागमठाण | अंशत: | 750 | 51 |
| 16 | | हमरापुर | अंशत: | 143 | 23 |
| | | **एकुण** | | **4256** | **2397** |
| | **पैठण** | **5 गावे पुर्णत:** | **9 गावे अंशत:** | **एकुण 14 गावे** | एकुण बाधीत कुटुंब 2393 |
| | **वैजापूर** | **9 गावे पुर्णत:** | **7 गावे अंशत:** | **एकुण 16 गावे** | एकुण बाधीत कुटुंब 2397 |
| | **2 तालुके** | **14 गावे पुर्णत:** | **16 गावे अंशत:** | **एकुण 30 गावे** | एकुण बाधीत कुंटुंब 4790 |

पैठण तालुक्यातील पुरग्रस्त गावापैकी (5) गावांचे पुर्णत: तर (9) गावांचे अंशत: अशा एकुण (14) गाव आणि वैजापूर तालुक्यातील (9) गावांचे पुर्णत: तर (7) गावांचे अंशत: अशा एकुण (16) गावांचे पुनर्वसन करावयाचे आहे. औरंगाबाद जिल्हयात असे एकुण (14) गाव पुर्णत: (16) गाव अंशत: एकुण (30) गावाचे प्रस्ताव शासना सादर करण्यात आला आहे. त्याच प्रमाणे वैजापूर, गंगापूर व पैठण या तीन तालुक्यातील पूरग्रस्त गावांना पक्के रस्ते तयार करण्यासाठी व जमीन संपादनाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे.

**औरंगाबाद जिल्हयातील प्रमुख नदया :-** गोदावरी या जिल्हयातील प्रमुख नदया आहेत. गोदावरी नदी जिल्हयाच्या पश्चिम सीमेवरुन वाहते. पुढे ती वैजापूर व गंगापूर या तालुक्यांच्या सीमेवरुन वाहते. तिला शिवना, सुखना, खाम, येलगंगा,या नदया मिळतात. गोदावरी या नदयांचा संगम पैठणच्या जायकवाडी धरणात येवुन मिळतो. त्याशिवाय जिल्हयात शिवना, सुखना, खाम, येलगंगा, पूर्णा, नदया आहेत.

**जायकवाडी प्रकल्प :-**औरंगाबाद जिल्हयातील गोदावरी नदीवर बांधलेले धरण महाराष्ट्रातील सर्वात जास्त लांबीचे माती धरण आहे. १०.२ कि मी लांब माती धारणपैकी दगडी धरण

सांडव्याची लांबी ६१० मीटर असुन त्याव्दारे धरणातून पुराचे पाणी सोडण्यसाठी **१२.५ मी X ७.९ मिटर आकाराचे २७ चक्र दरवाजे** दगडी धरणावर बसविलेली आहे. ज्या व्दारे **१८१५० घन मिटर प्रति सेकंदा प्रमाणे विसर्ग सोडला जावू शक्तो.** धरणात जलाशय साठण्याची क्षमता **२९०९ द.ल.घ.मी.** आहे. धरणाचे पाणलोट क्षेत्र २१७५० चौ.कि.मी. इतका आहे. गोदावरी खोऱ्यात गोदावरी नदीवर महाराष्ट्रातील हे धरण सर्वात शेवटचे मोठे धरण असुन मुळा धरण, भंडारदरा धरण, दारणा धरण, गंगापुर धरण, करंजवण धरण, पालखेड धरण, नांदुर मध्यमेश्वर धरण, ढेकु धरणातुन पाणी येतो.

**महापूर येण्याची कारणे** :-धरणाच्या पाणलोट क्षेत्रात अत्यल्प कालावधीत अतिवृष्टी झाल्यास महापूर येण्याची दाट शक्यता असते. पैठण धरणाबाबत पावसाळयांत छोटी व मोठी धरणे व बधारे भरल्यानंतर सोडलेले पाणी गोदावरी नदीस मिळून तदनंतर ते जायकवाडी धरणाच्या जलाश्यास येवुन मिळते. आणि नेमका त्याच वेळेस धरणाच्या मुक्त पाणजलोट क्षेत्रात free catchment of dam side अतिवृष्टी झाल्यास धरणामध्ये महापुर येवु शकतो. वरील छोटया व मोठया धरण आणि बंधाऱ्याच्या पाणलोट क्षेत्रात पाउस झालेला नसतांनाही जर पैठण धरणाच्या मुक्त पाणलोट क्षेत्रात जे ७०% आहे अल्प कालावाधीत अतितीव्र दृष्टी झाल्यांसही महापूर येण्याची शक्यता असते.

## जायकवाडी धरणात महापूर आल्यास विसर्ग सोडण्याबाबतची क्षमता (Capacity)

जायकवाडी धरणाच्या सांडव्याची इंग्लीश फलडनुसार जास्तीत जास्त पुराचे पाणी सोडावयाची पुरक्षमता ६,४१,००० क्यूसेक्स इतकी आहे. वतहत्तम विसर्ग क्षमता ८,००,००० क्यूसेक्स इतकी आहे. त्यासाठी ५,००,००० क्यूसेक्स विसर्ग पैठण धरणाच्या सांडव्यावरुन गोदावरी नदी पाण्यात सोडल्यास गोदावरी नदीकाठच्या पैठण शहरासह तालुक्यातील एकुण १७ गावांना त्याची क्षती धोका पहोचू शकतो. वर्ष २००८ पुर परिस्थितीचा आढावा घेतले असता नदी पात्रात १,५०,००० क्युसेस पाणी सोडल्याने पैठण शहरातील एस.टी.स्टॅन्ड, स्टेट बॅंक आफ इंडिया, पोलीस स्टेशन व गावा बाहेरील नाथ मंदीर या महत्वाचे ठिकाणी चार ते साडेचार फुटा पर्यंत पाणी साचले होते.

**पुरग्रस्त गावे, गोदावरी नदी काठाचे Blue Zone मध्ये येणारे गाव :-** वर्ष २००६ मध्ये पुर परिस्थती निमार्ण झाली होती यावेळी सुमारे ३,५३,००० क्युसेक्स विसर्गाने पाणी येत होता. या पुर परिस्थिती लक्षात घेता गोदावरी नदी काठाच्या गाव Blue Zone आणि Red Zone मध्ये ठेवण्यात आले. सिंचन विभागाने दिलेली माहितीनुसार Blue Zone मध्ये येणारे (४३) गावे खालील प्रमाणे आहे

### -: गोदावरी नदी /जायकवाडी प्रकल्प पुरग्रस्त, बाधीत गाव :- (Under Blue line)

| तालुका | बाधीत गावाचे नांव | बाधीत लोकसंख्या | ग्राम पंचायत |
|---|---|---|---|
| **पैठण** | पैठण शहर | १५६६१ | तहसिल |
| 2 | दादेगाव | 300 | 1. दादेगाव |
| 3 | चनकवाडी | 89 | 2. चनकवाडी ग्रुप ग्रा.पं |
| 4 | तेलवाडी | 476 | चनकवाडी ग्रुप ग्रा.पं |
| 5 | हिरडपुरी | 1400 | 3. हिरडपुरी |
| 6 | नवगाव | 1800 | 4. नवगाव |
| 7 | टाकळी अंबड | 600 | 5. टाकळी अंबड |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | कावसान | 537 | 6. कावसान |
| 9 | पिंपळवाडी | 180 | 7. पिंपळवाडी |
| 10 | वडवाडी | 1846 | 8. वडवाडी |
| 11 | नायगाव | 1930 | 9. नायगाव ग्रुप ग्रा प |
| 12 | मायगाव | 858 | नायगाव ग्रुप ग्रा प |
| 13 | वाघाडी | 170 | नायगाव ग्रुप ग्रा प |
| 14 | पाटेगाव | 800 | 10. पाटेगाव |
| 15 | आपेगाव | 460 | 11. आपेगाव |
| 16 | उंचेगाव | 700 | 12. उंचेगाव |
| 17 | पंथेवाडी | 210 | तहसिल |
| 18 | खलवाडी | 300 | तहसिल |
| *18* | *एकुण* | | *12* |
| **वैजापूर** | सावखेडगंगा | 185 | 1. सावखेडगंगा |
| 2 | नागमठाण | 365 | 2. नागमठाण |
| 3 | नांदुरढोक | 160 | 3. बाभुळगांव ग्रुप ग्राप |
| 4 | बाभुळगांव गंगा | 846 | बाभुळगांव ग्रुप ग्राप |
| 5 | चांदेगाव | 80 | 4.चांदेगाव |
| 6 | चेंडुफळ | 314 | 5.चेंडुफळ |
| 7 | देवगावशनी | 90 | 6.देवगावशनी |
| 8 | लाखगंगा | 180 | 7.लाखगंगा |
| 9 | बाबतारा | 270 | 8.बाबतारा |
| 10 | पुरणगाव | 527 | 9.पुरणगाव |
| 11 | वांजरगाव | 247 | 10.वांजरगाव |
| 12 | अव्वलगाव | 173 | 11.हमरापुर ग्रुप ग्राप |
| 13 | हमरापुर | 131 | हमरापुर ग्रुप ग्राप |
| 14 | डोणगाव | 524 | 12.डोणगाव |
| 15 | भालगाव | 299 | 13.भालगाव |
| 16 | बाजाठाण | 500 | 14.बाजाठाण |
| 17 | डागपिंपळगांव | 210 | 15.डागपिंपळगांव |
| *17* | *एकुण* | | *15* |
| **तालुका** | **बाधीत गावाचे नांव** | **बाधीत लोकसंख्या** | **ग्राम पंचायत** |
| **गंगापूर** | जामगाव | 1047 | 1. जामगाव |
| 2. | कायगाव | 209 | 2. कायगाव ग्रुप ग्राप |
| 3 | नेवरगाव | 1037 | कायगाव ग्रुप ग्राप |
| 4 | अमळनेर | 834 | कायगाव ग्रुप ग्राप |
| 5 | लखमापूर | 71 | 3. लखमापूर |
| 6 | लिंबेजळगाव | 212 | 4. लिंबेजळगाव |
| 7 | अगरकानडगाव | 184 | 5. अगरकानडगाव ग्रुप ग्राप |
| 8 | हैबतपूर | 149 | अगरकानडगाव |
| *8* | *एकुण* | | *5* |

**सिंचन विभागाचे पुर नियंत्रण कक्ष :-** सिंचन विभागाची पूर नियंत्रण कक्षाची स्थापन करण्यात आली आहे. या वर्षी बिनतारी संदेश यंत्रणामध्ये ४३ VHF set, ३१ वाकीटाकी, व १० HF set, बसविण्यात आले नगर व नाशिक जिल्हयांतुन जायकवाडीमध्ये पाणी येते प्रकल्पात किती पाणी येणार याचा अंदाज सुमारे ४२ तास आधी करण्यात येतो.

**महसुल विभागाचा पुर नियंत्रण कक्ष :-**जिल्हाधिकारी कार्यालय औरगाबाद व तहसिल कार्यालय पैठण येथे पुर नियंत्रण कक्ष स्थापीत करण्यात आले आहे. धरणाची पातळी व येणारा पुर याची दर तासाची माहीती घेण्यात येते.

**प्रतिबंधक उपाय योजना :-** प्रतिबंधक उपाय योजना करण्यासाठी पूराचे पूर्वानुमान करणे आवश्यक आहे. त्यासाठी शासकीय यंत्रणा पावसाळयात २४ तास सतत कार्यरत असते. यामध्ये पाटबंधारे खाते, केंद्रीय जल आयोग, पाटबंधारे खात्याची बिनतारी संदेश यंत्रणा कार्यरत असुन तीनही यंत्रणेच्या समन्वयांतुन पुराचे पूर्वानुमान केले जाते. अतिवृष्टीच्या काळात जायकवाडी धरणावर पोलीस बिनतारी संदेश यंत्रणा उभारली जाते व त्या यंत्रणेव्दारे धरणाचा पाणलोट क्षेत्रांतील खालील केंद्रावरुन संबंधित धरण अथवा बंधारा इत्यादीची पाणी पातळी आणि विसर्गा बाबतची माहीती दर तासांनी पैठण धरणावर प्राप्त होते.

**पाणी सोडण्यापुर्वी करावयाची कार्यवाही :-**धरणातून नदीच्या पात्रांत पाणी सोडण्यापुर्वी महसूल खाते मार्फत तहसिलदार पैठण, पोलीस खाते, नगर परिषद पैठण, पंचायत समिती इतर कार्यालयांना २४ तास अगोदर पुर्व कल्पना देण्यात येते. आकाशवाणी, वर्तमानपत्रे व इतर प्रसार माध्यमाव्दारे पाणी सोडण्या बाबतचे जाहीर प्रगटन प्रसारित करुन लोकांना सावधानतेचा इशारा देण्यात येतो. पाटबंधारे खात्या मार्फत सुचना मिळताच तहसिलदार पैठण, नदी काठाच्या गावातील लोकांना तलाठी व तत्सम महसुल कर्मचाऱ्या मार्फत नदी काठच्या गावात पुरा बाबत दंवडी देवुन लोकांना पुर्व कल्पना व सावधानतेचा इशारा देण्यात येतो. आपतकालीन पूर पातळी पाढल्यानंतर महसुल खात्या मार्फत पूर रेषे खालील लोकांना सुरक्षित स्थळी स्थालांतरीत करण्यात येते. पोलीस खात्यांस पुराबाबत पुर्व सुचना मिळाल्यानंतर महसूल खात्याच्या समन्वयाने लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यास मदत केली जाते.

**धरणातुन पाणी सोडण्याची प्रक्रीया :-** पैठण धरणची पाणी पातळी भरल्यानंतर जलाश्यांत येणाऱ्या पाण्याची आवाक विचारांत घेवून धरणाच्या सांडव्याव्दारे नदीच्या पात्रात पाणी सोडुन जलाश्य प्रचलन आराखडयानुसार पाणी सोडला जातो. मंजुर जलाश्य प्रचलन आराखडयानुसार १ ऑगस्ट रोजी ९१.६७% व १५ ऑगस्ट रोजी ९४% उपयुक्त साठा असावा. प्रचलन आराखडयापेक्षा जास्त असलेले पाणी नदीच्या पत्रात साडून देण्यात येते.

## मागील पुर परिस्थिती इतिहास

**वर्ष १९९० पुर परिस्थिती :-** या पुर्वी १९९० मधील पुरामध्ये पैठण जायकवाडी धरणाच्या सांडव्यावरुन १,८४,००० क्यूसेक्स एवढा विसर्ग सोडण्यात आला होता. त्यावेळी पैठण शहरातील एस.टी.स्टॅन्ड, स्टेट बँक आफ इंडिया, पोलीस स्टेशन व गावा बाहेरील नाथ मंदीर या महत्वाचे ठिकाणी चार ते साडेचार फुटा पर्यंत पाणी साचले होते.

**वर्ष १९९४ पुर परिस्थिती :-** १९९४ मध्ये अतिवृष्टीमुळे जायकवाडी धरणाच्या सांडव्यावरुन १,१६,००० क्यूसेक्स एवढा विसर्ग सोडण्यात आला होता. त्यावेळी सदरील विसर्ग पुर्ण पणे नदी पात्रात साचला होता व पैठण शहराला कोणतीही हणी पहोचली नाही.

वर्ष २००५ पुर परिस्थिती :- २६ व २७ जुलै २००५ राजी मुंबईसह महाराष्ट्र राज्यात अतिवृष्टी झाली. दि २७ जुलै ते २ ऑगस्ट २००५ दरम्यान अतिवृष्टी मुळे गोदावरीला पुर आला होता. जायकवाडी धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे व धरणाच्या उर्ध्व बाजुचे सर्व धरण १००% भरल्यामुळे मोठया प्रमाणात पाणी आवक असल्यामुळे पैठण धरणाच्या सांडव्यावरुन ४ वेळेस जास्तीत जास्त १,१६,००० क्यूसेक्स एवढा विसर्ग सोडण्यात आला होता जायकवाडी धरणातुन एकूण **२६१५.१६ द.ल.घ.मी.** जास्तीचे पाणी सोडण्यात आला होता.

वर्ष २००६ पुर परिस्थिती :- सन २००६ मध्ये औरंगाबाद जिल्हयात ६७५ वार्षीक सरासरी १४/१०/२००६ -पर्यंत ८८५ पावसाची नोंद झाली होती १३३% सरासरी टक्केवारी पाउस पडला होता. जायकवाडी धरणाच्या वरच्या भागात दि ३ ते १२ ऑगस्ट २००६ च्या दरम्यान एकादिवसात ८५ मि मि ते २५५ मी मी एवढा पाउस पडला व सर्व ठिकाणी अतिवृष्टी होती. ओझर धरण ५६१ मिमी, भंडारदरा १०४२ मिमी, पालखेड ५८७ मिमी. नांदुर मधमेश्वर या बंधाऱ्यावरुन २,८१,००० क्युसेक्स, मुळा प्रकल्पातु ४४,००० क्युसेक्स, भंडारदरा धरणातुन २९,००० क्युसेक्स यावेळी पैठण धरणात सुमारे ३,५३,००० क्युसेक्स विसर्गाने पाणी येत होता.

वर्ष २००८ पुर परिस्थिती :- १२ व १३ सप्टेंबर, २००८ रोजी नाशिक व त्रिबकेश्वर येथे अतिवृष्टीमूळे गोदावरी नदीला पुरपरिस्थिती निमार्ण झाली होती. गंगापूर, NMC, मुळा व भांडारदारा धरणातुन जायकवाडी धरणात १७६१२८ क्युसेस पाणी सोडल्यामुळे पुर परिस्थिती निमार्ण झाली. येणाऱ्या पाण्याचा अंदाज घेवून ४८ तास अगोदर जायकवाडी धरणातुन २५,००० क्युसेस पाणी सोडायला सुरुवात करण्यात आली व १,५०,००० क्युसेस पर्यंत वाढून पाणी सोडण्यात आले व जायकवाडी धरण ७% रिकामे (buffer area) करण्यात आले. पाणी सोडण्याचे नियोजन वेळीच करण्यात आल्याने जायकवाडी धरणातुन सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे कोणतीही वित्त व जिवित्त हानी झालेली नाही. नंतर गंगापूर, NMC, मुळा, भांडारदारा धरणातुन येणारा पाणी जायकवाडी धरणात समावून घेण्यात आले व दिनांक ३१/०९/२००८ रोजी धरण १००% टक्के ठेवण्यात आला.

## औरंगाबाद जिल्हयातील धरणे/नदी/नाले :-

औरंगाबाद जिल्हयात खालील प्रमाणे धरण आहेत.

| अ.क | धरणाचे नांव | तालुका |
|---|---|---|
| 1 | सुखना प्रकल्प | औरंगाबाद |
| 2 | लहुकी प्रकल्प | औरंगाबाद |
| 3 | हर्सुल तलाव | औरंगाबाद |
| 4 | जायकवाडी प्रकल्प | पैठण |
| 5 | खेळणा प्रकल्प | सिल्लोड |
| 6 | कोल्ही प्रकल्प | वैजापूर |
| 7 | नारंगी सारंगी प्रकल्प | वैजापूर |
| 8 | ढेकु प्रकल्प | वैजापूर |
| 9 | बोरदहेगाव प्रकल्प | वैजापूर |
| 10 | टेंभापूरी प्रकल्प | गंगापूर |
| 11 | अंबाडी प्रकल्प | कन्नड |
| 12 | शिवना प्रकल्प | कन्नड |

| | | |
|---|---|---|
| 13 | पुर्णा प्रकल्प | कन्नड |
| 14 | अंजना पळशी प्रकल्प | कन्नड |
| 15 | गिरजा प्रकल्प | खुलताबाद |
| 16 | गडदगड प्रकल्प | सोयगाव |

## _औरंगाबाद जिल्यातील नदया व नदी काठाच्या गावे

| तालुका | नदी | नदी काठाचे गाव |
|---|---|---|
| औरंगाबाद गाव (१६) | लहुकी नदी | बनगाव, भारंबा, दुधड, घायगाव, शेकटा, |
| | सुखना नदी | दुधड, पिंप्रि, सांजखेडा, टाकळी, दरेगाव, घारेगाव |
| | केसापुरी नदी | गाढेजळगाव |
| | दुंधना नदी | शेकटा, लाडसांवगी, सय्यदपुर, ढवळापुरी, |
| पैठण गाव (१५) | गोदावरी नदी | १) पैठण २) कावसान, ३) चनकवाडी, ४) तेलवाडी, ५) पाटेगाव, ६) दादेगाव जहागीर, ७) वाघाडी, ८) वडवाळी, ९) नायगाव, १०) मायगाव, ११) आपेगाव, १२) नवगाव, १३) आवडे उंचेगाव, १४) टाकळी अंबड, १५) हिरडपुरी , |
| फुलंब्री गाव (७) | गिरजा नदी | १) पिंपळगाव वळण, २) पाथ्री, ३) वडोद बाजार, ४) वडोद खु, ५) शेवता बु |
| | फुलमस्ता नदी | १) बिल्डा, २) सांजुळ |
| वैजापुर गाव (३१) | गोदावरी नदी | १) वांजरगाव, २) लाखगंगा, ३) पुरणगाव, ४) बाबतारा, ५) अव्वलगाव, ६) चेंडुफळ, ७) चांदेगाव, ८) सावखेडगंगा, ९) डाकपिंपळगाव, १०) भालगाव, ११) नांदुरढोक, १२) डोनगाव, १३) बाभुळगांवगंगा, १४) नागमठाण, १५) हमरापुर, १६) देवगांवशनि, १७) बाजाठाण |
| | विरभद्रा नदी | १) हिगणी, २) डेरा, ३) नांदर |
| | मल्हारी माता | १) पाचोड बु |
| | सुकना नदी | १) घारेगाव, २) एकतुनी |
| | येलगंगा नदी | १) ढाकेफळ, २) नांदलगाव, ३) ७४ जळगाव, ४) धुपखेडा ५) दिन्नापुर |
| | नारंगी सारंगी नदी | खंडाळा, २)लाखगंगा, ३) वैजापुर, ४) डवाळा, ५) नगीना पिंपळगाव |
| | शिवना नदी | १)लासुरगाव, २)फैजापुर, ३)सोनवाडी, ४) पिंपळगाव, ५)दहेगाव, ६)जैतापुर, ७)अनंतपुर, ८)बोरसर, ९)टाकळी, |
| गंगापुर गाव (२६) | गोदावरी नदी | १)नेवरगाव, २) जामगाव ३) कायगाव, |
| | शिवना | १) मालुजा खु, २) मालुंजा बु, ३) शिरजगाव, ४) बाबरगाव, ५) ढोरेगाव, ६) सोलेगाव, |
| | खाम | १) शिवपुर २) शेंदुरवादा ३) धामोरी बु |
| | नारंगी सारंगी नदी | १) लव्हाली टाकळी, २) कोपापुर, ३) ढोरेगाव, ४) सोलेगाव, ५) नेवरगाव, ६) मंडापुर, ७) माळुंजा, ८) भायगाव, ९) मांजरी, १०) वाहेगाव, ११) शिल्लेगाव, १२) झोळेगाव, १३) अकोलीवडगाव, १४) काटेपिंपळगाव. |
| खुलताबाद गाव (६) | गिरजा | म्हैसमाळ, येसगाव |
| | फुलमस्त | सुलतानपुर, येसगाव |
| | येळगंगा | महैसमाळ , वेरुळ |

| | | |
|---|---|---|
| सिल्लोड गाव (१०) | पूर्णा | १) सावरखेडा खु , २) सावरखेडा बु, ३) बोरगांव बाजार, ४) दिडगांव, ५) शिसारखेडा, ६) भवन |
| | केळणा | १) बहुली, २) पालोद, ३) अन्वी, ४) डोंगरगांव |
| कन्नड गाव (४८) | शिवना नदी | १) अंधानेर, २) मक्रणपुर, ३) कन्नड, ४) बाहिरगाव, ५) दाभाडी, ६) हतनुर, ७) टापरगाव, ८) अंतापुर, ९) केसापुर, १०) आलापुर, ११) वैसपुर, १२) टाकळी ल., १३) बोरसर बु, १४ ) बोरसर खु, १५) शेवता, १६) लामनगाव, १७) देवळी |
| | वेळगंगा नदी | देवळी, देभेगाव |
| | पुर्णा नदी | १) नागापुर, २) करंजखेडा, ३) रेउळगाव, ४) नेवपुर, ५) बरकतपुर, ६) रायगाव, ७) वाकद, ८) दिगाव, ९) खेडी |
| | अंजना नदी | १) निंभोरा, २) वासडी, ३) देवपुळ, ४) पळशी, ५) पिंपरखेडा, ६) नादरपुर, ७) जवखेडा खु, ८) जवखेडा बु , ९) नाचनवेल, १०) कोपरवेल, ११) टाकळी बु |
| | गडदगड नदी | नागद |
| | गांधारी नदी | १) चिकलठाण, २) निमडोंगरी, ३) घुसुरतांडा |
| | नारंगी सारंगी नदी<br>शिवना नदी | १) मुंदवाडी, २) अंधानेर, ३) मकरनापुर, ४) कन्नड, ५) बहिरगाव, ६) दाभाडी, ७)भोकरगाव, |
| सोयगाव गाव (६) | सोना नदी | गलवाडा, सोयगाव, आमखेडा |
| | वाघुर नदी | लेणापुर, फर्दापुर, धनवट |
| **गाव (१६५)** | **एकुण गाव** | **१६५** |

## औरंगाबाद जिल्हयात पुरामुळे धोका निर्माण होण्याची संभाव्य कारणे :-

1. अतिवृष्टीमुळे नदीला आलेल्या पुरामुळे
2. जायकवाडी धरणाचे जादा पाणी सोडल्यामुळे
3. लगतच्या नाशिक जिल्हयामधुन धरणाचे पाणी सोडल्यामुळे

## पुरपरिस्थिती निर्माण होऊ नये म्हणुन करण्यात आलेली उपाययोजना :-

नैसगिक आपत्तीवरील उपाययोजना सबंधात सभा आयोजीत करण्यात आली. सदर सभेत खालीलप्रमाणे सुचना देण्यात आले.

अ) अधिक्षक अभियंता, कडा जायकवाडी धरणातील पाणी नियोजनबध्द सोडण्या बाबत सुचित करण्यात आले.

ब) महानगर पालिका, मुख्याधिकारी, नगरपरिषद औरंगाबाद यांना शहरातील नाले तुंबणार नाहीत याकरिता नाल्या सफाई मोहीम राबविणे.

क) महानगर पालिका औरंगाबाद यांचेकडे उपलब्ध असलेल्या बोटी सुस्थितीत ठेवण्यास सुचित करण्यात आले.

## अतिवृष्टी/पुराची पूर्व सुचना देणे :-

1. अतिवृष्टीची सुचना (Heavy Rainfall) सर्व उपविभागीय अधिकारी तसेच सर्व तहसिलदार यांनी दुरध्वनीव्दारे व बिनतारी संदेश, एस.एम.एस व्दारे देण्यात येते.

2. भारतीय हवामान सव्हेक्षण ,नागपूर येथून चक्रीवादळ तथा अतिवृष्टीची सूचना आपतकालीन व्यवस्थापन समीतीची बैठक घेऊन संबधीत विभागास सतर्क केले जाते.
3. नगरपरिषद क्षेत्रात लाऊडस्पिकरवरुन सतर्कता/स्थलांतरणाचा इशारा.

## आपत्ती व्यवस्थापण कार्यवाही :-

आपत्ती व्यवस्थापण अंतर्गत जिल्हास्तरीय समन्वये समितीची सभा घेण्यात येते.

## जिल्हास्तरावर तसेच तालुका स्तरावर नियंत्रण कक्षाची स्थापणा करणे :-

जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालय येथे तसेच तालुका स्तरावर तहसिल कार्यालय येथे पुर नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात यावी. या नियंत्रण कक्षात महसूल विभाग तसेच इतर विभागातील कर्मचा-यांची नेमणूक करण्यात यावी . जिल्हा आपातकालीन व्यवस्थापन नियंत्रण कक्षाचा दुरध्वनी कमांक टोल फ्री क्र 1077 किंवा 2331077 फॅक्स क्र 2320488 email : collector_aurangabad@maharashtra.gov.in हा आहे.

## शोध व बचाव पथकाची स्थापन करणे :-

शासण निर्णय कमांक डीएमयु-2006/सीआर-12/डीएम-1 दिनांक 1 जुन,2006 शासन पत्रातील निदेशानुसार जिल्हास्तरावर तसेच तालुकास्तरावर शोध व बचाव पथकाची स्थापना करण्यात आली आहे. तपशिल खालील प्रमाणे आहे.

### औरंगाबाद जिल्हा शोध व बचाव पथक

| अ.क्र | जिल्हा शोध व बचाव पथक अधिकारी / पदाधिकारी | पद |
|---|---|---|
| 1 | श्री उध्दव घुगे, उपआयुक्त, महानगर पालीका औरंगाबाद<br>0240-2334388 मोबाईल 9765000010 | **पथक प्रमुख** |
| 2 | श्री आय एस पठाण, सहा पोलीस निरीक्षक पोलीस आयुक्तालय,<br>दुरध्वनी क्र 0240-2381633, 2392151 मोबाईल 9923429228 | **पथक उपप्रमुख** |
| | **कार्यकारी गट क्रमांक 1** | |
| 3 | श्री.आर आर कुबेर, स्टेशन ऑफीसर मनपा औरंगाबाद<br>0240-2334000 मोबाईल 9823122791 | सदस्य |
| 4 | श्री.एस एम काकडे, सब ऑफीसर, मनपा औरंगाबाद<br>दुरध्वनी 0240-2334000, 2472099 मोबाईल 992308018 | सदस्य |
| 5 | श्री.आर पी दांडगे प्रमुख अग्निशामक, मनपा औरंगाबाद<br>दुरध्वनी 0240-2334000, मोबाईल 9823022792 | सदस्य |
| 6 | श्री.एम बी नरके, अग्निशामक मनपा औरंगाबाद<br>दुरध्वनी 0240-2334000, 2554255 मोबाईल 9881953478 | सदस्य |
| 7 | श्री.एच वाय घुगे, अग्निशामक मनपा औरंगाबाद<br>दुरध्वनी 0240-2334000, | सदस्य |
| 8 | श्री.एम एल मुंगसे, अग्निशामक मनपा औरंगाबाद<br>दुरध्वनी 0240-2334000, मोबाईल 9764179485 | सदस्य |
| 9 | श्री.व्ही आर लिमकर अग्निशामक मनपा औरंगाबाद<br>दुरध्वनी 0240-2334000, मोबाईल 9423448380 | सदस्य |
| 10अ | श्री.ए एन खांडेकर अग्निशामक मनपा औरंगाबाद | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | दुरध्वनी 0240-2472099, मोबाईल 9423741231 | |
| 10ब | श्री संपत कृष्णानाथ भगत, अग्निशामक मनपा औरंगाबाद<br>दुरध्वनी 0240-2334000, मोबाईल 9423149829 | सदस्य |
| | **कार्यकारी गट क्रमांक 2** | |
| 11 | श्री एम एन सपकाळ होमगार्ड अधिकारी औरंगाबाद 281<br>दुरध्वनी 0240-2334683 मोबाईल 9890585412 | सदस्य |
| 12 | श्री एस एन साळवे होमगार्ड 498<br>दुरध्वनी 0240-2334683 का 6517464 नि मोबाईल 9372237999 | सदस्य |
| 13 | श्री डी व्ही वाडवे होमगार्ड 381<br>दुरध्वनी 0240-2334683 | सदस्य |
| 14 | श्री पी डी सुर्यवंशी होमगार्ड 512<br>दुरध्वनी 0240-2334683,2391180 मोबाईल 9923743789 | सदस्य |
| 15 | श्री एन एस साळवे होमगार्ड 424<br>दुरध्वनी 0240-2334683 मोबाईल 9823578329 | सदस्य |
| 16 | श्री सचिन सुभाषराव माथीकर, होमगार्ड 413<br>दुरध्वनी 0240-2334683 मोबाईल 9823654746 | सदस्य |
| 17 | श्री ए बी सुरळकर होमगार्ड 513<br>दुरध्वनी 0240-2334683 मोबाईल 9922464238 | सदस्य |
| 18 | श्री ए एस दाभाडे होमगार्ड 341<br>दुरध्वनी 0240-2334683 मोबाईल 99704409882 | सदस्य |
| | **कार्यकारी गट क्रमांक 3** | |
| 19 | श्री.एस बी पवार पोलीस कर्मचारी,बक्कल न.480, जवाहरनगर पो.स्टे पोलीस आयुक्त औरंगाबाद<br>दुरध्वनी क्र 0240-2240556 मोबाईल 9850430530 | सदस्य |
| 20 | श्री.आर पी घोळवे, पोलीस कर्मचारी, बक्कल न 527 पोलीस आयुक्त औरंगाबाद दुरध्वनी 0240-2240500 मोबाईल 9823970543 | सदस्य |
| 21 | श्री.एस एस ढोले, पोलीस कर्मचारी, पोलीस आयुक्त औरंगाबाद 559<br>दुरध्वनी 0240-2240500 | सदस्य |
| 22 | श्री.पी आर जाधव, पोलीस कर्मचारी, बक्कल न 726 पोलीस आयुक्त औरंगाबाद दुरध्वनी क्र 0240-2240591 मोबाईल 9923177511 | सदस्य |
| 23 | श्री.टि एस निंभोरे, पोलीस कर्मचारी, पोलीस आयुक्त औरंगाबाद 747<br>दुरध्वनी 0240-2240500 मोबाईल 9823803595 | सदस्य |
| 24 | श्री.ए यु शेख, पोलीस कर्मचारी, जवाहरनगर पो.स्टे. बक्कल नं 885 पोलीस आयुक्त औरंगाबाद 0240-2240556 मोबाईल 9823704885 | सदस्य |
| 25 | श्री.बी पी जगताप, पोलीस कर्मचारी, पोलीस आयुक्त औरंगाबाद 868<br>दुरध्वनी 0240-2240500 | सदस्य |
| 26 | श्री.एम डी सोनवणे, बक्कल क्र 910, पोलीस कर्मचारी, बेगमपुरा पो.स्टे, पोलीस आयुक्त औरंगाबाद<br>दुरध्वनी 0240-2240562 मोबाईल 9923441253 | सदस्य |
| | **तांत्रीक सहाय्य गट** | |
| 27 | श्री ए आर थोरात , सहा. जिल्हा विज्ञान सुचना अधिकारी, औरंगाबाद | माहिती तज्ञ |

| | | |
|---|---|---|
| | 0240-2336446 मोबाईल 9370362914 | |
| 28 | श्री. गोविंद अहंकारी जिल्हा माहिती अधिकारी औरंगाबाद दुरध्वनी 0240-2331285 मोबाईल 9850079173 | जनसंपर्क तज्ञ |
| 29 | श्री.आर एल देशपांडे, शाखा अभियंता, पंचायत समिती गंगापुर, जिल्हा परिषद औरंगाबाद दुरध्वनी 02433-221005 मोबाईल | अभियंता |
| 30 | श्री.बी ई मानकापे, शाखा अभियंता, पाणी पुरवठा उपविभाग पैठण, जिल्हा परिषद औरंगाबाद 0240-2330649 मोबाईल 9423030005 | अभियंता |
| 31 | डॉ सचिन देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक औरंगाबाद दुरध्वनी 0240-2331019 मोबाईल 9422212516 | वैद्यकीय अधिकारी |
| 32 | श्री. पी. बी. नैनाव, आरोग्य सहाय्यक, प्राथमिक आरोग्य केंद्र, बोरसर ता. वैजापुर दुरध्वनी क्र 0240-2350744 मोबाईल 9421417061 | वैद्यकीय सहायक (पुरुष) |
| 33 | श्रीमती पी. के. पारीसे, आरोग्य सहाय्यक, प्रादेशिक अधिकारी, शिवुर, वैजापुर. दुरध्वनी क्र 02436-284281 मोबाईल 9421686069 | वैद्यकीय सहायक (स्त्रि) |
| | **प्रशासकीय सहाय्य गट** | |
| 34 | श्री व्हि.जी.पाटील, नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय वैजापूर दुरध्वनी क्र 02436-222066 मोबाईल 9421502010 | प्रशासन अधिकारी |
| 35 | श्री शेखर शिंदे,तलाठी, तहसिल कार्यालय गंगापूर दुरध्वनी क्र 02436-222066 मोबाईल 9422214407 | कार्यालयीन कर्मचारी |
| 36 | श्री राजेंद्र शिंदे, मंडळ अधिकारी, तहसिल कार्यालय पैठण दुरध्वनी 02431-223003,2483875 मोबाईल 9423780763 | कार्यालयीन कर्मचारी |
| | **एकूण 36 सदस्य** | |

## राखीव शोध व बचाव पथक

| अ क्र | औरंगाबाद जिल्हा शोध व बचाव पथक अधिकारी/पदाधिकारी | पद |
|---|---|---|
| 1 | डॉ. अनंत गव्हाणे, उप जिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद दुरध्वनी 0240-2334501-3 विस्तारीत क्र 206(का) मोबाईल 9420205555 | **पथक प्रमुख** |
| 2 | श्री. बालाजी क्षिरसागर, तहसिलदार औरंगाबाद दुरध्वनी क्र 0240-2334728 मोबाईल 9420219702 | **पथक उपप्रमुख** |
| **क** | **कार्यकारी गट क्रमांक 1** | |
| 3अ | श्री. मो. जाफर खांन, अग्निशामक मनपा औरंगाबाद दुरध्वनी 0240-2334000, मोबाईल 9270325669 | सदस्य |
| 3ब | श्री एम एस मोरे अग्निशामक मनपा औरंगाबाद दुरध्वनी 0240-2334000, | सदस्य |
| 4 | श्री एस एस दुधे वाहनचालक, अग्निशामक मनपा औरंगाबाद दुरध्वनी 0240-2334000, | सदस्य |
| **क** | **कार्यकारी गट क्रमांक 2** | |
| 6 | श्री पी एस दांडगे होमगार्ड 415 मोबाईल 9960905160 | सदस्य |
| 7 | श्री सय्यद अखतर होमगार्ड 192मोबाईल 9766183392 | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| 8 | श्री सईद अहमद होमगार्ड 189मोबाईल 9823090549 | सदस्य |
| 9 | श्री एम डी गायकवाड होमगार्ड 393 मोबाईल 9960905160 | सदस्य |
| 10 | श्री ए एल शेळके होमगार्ड 501दुरध्वनी 0240-2334683 | सदस्य |
| **क** | **कार्यकारी गट क्रमांक 3** | |
| 11 | श्री आर बी बोचरे, पोलीस कर्मचारी पोलीस आयुक्त औरंगाबाद 127 दुरध्वनी क्र 2240500 | सदस्य |
| 12 | श्री एस एन नरवडे, पोलीस कर्मचारी, बक्कल न 158 पोलीस आयुक्त औरंगाबाद दुरध्वनी क्र 2240500 मोबाईल 980398956 | सदस्य |
| 13 | श्री बी के शहरवाले पोलीस कर्मचारी पोलीस आयुक्त 319 औरंगाबाद दुरध्वनी क्र 2240500 मोबाईल 9823210019 | सदस्य |
| 14 | श्री आर एस शिरसाठ पोलीस कर्मचारी पोलीस आयुक्त औरंगाबाद 361 दुरध्वनी क्र 2240500 | सदस्य |
| 15 | श्री एस पी पांचाळ पोलीस कर्मचारी पोलीस आयुक्त औरंगाबाद 446 दुरध्वनी क्र 2240500 | सदस्य |
| **ड** | **तांत्रिक सहाय्य गट** | |
| 16 | श्री एस बी व्हरसाळे, संशोधन सहाय्यक, नियोजन, औरंगाबाद 0240-2334285 मोबाईल 9922332901 | माहिती तंत्रज्ञ |
| 17 | श्री चंद्रशेखर सांगोळे, माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय औरंगाबाद 0240-2331285 मोबाईल 9822796606 | जनसंपर्क तज्ञ |
| 18 | श्री ए एम मुंगीकर, शाखा अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद दुरध्वनी क्र 0240-2331576 मोबाईल PP 9422709847 | अभियंता |
| 19 | श्री एस जी तोरणेकर, शाखा अभियंता, उपविभाग सिंचन वैजापूर, जिल्हा परिषद औरंगाबाद दुरध्वनी क्र 0240-2331576 मोबाईल PP 9422709847 | अभियंता |
| 20 | डॉ वाय आर सवाई, प्राथमिक आरोग्य केंद्र, दौलताबाद, ता औरंगाबाद 0240-2350744 मोबाईल 9421908087 | वैद्यकिय अधिकारी |
| 21 | श्री. आर. जे. काथार, प्राथमिक आरोग्य केंद्र, पिंपळवाडी ता पैठण 02431-223037 PHC Paithan | वैद्यकिय सहाय्यक (पुरुष) |
| 22 | श्रीमती ए एच खाजोने,प्राथमिक आरोग्य केंद्र, आडूळ, ता पैठण 02431-223037 PHC Paithan | वैद्यकिय सहाय्यक (स्त्री) |
| **ई** | **प्रशासकिय सहाय्य गट** | |
| 23 | श्री जे जे कारभारी, तहसिलदार सिल्लोड दुरध्वनी 02430-222029 मोबाईल 9422468281 | प्रशासन अधिकारी |
| 24 | श्री पी एम देवळे मंडळ अधिकारी तहसिल कार्यालय वैजापूर दुरध्वनी 02436-222066 मोबाईल 9423397859 | कार्यालयीन कर्मचारी |
| 25 | श्री अनंत शेवतेकर, तलाठी तहसिल कार्यालय पैठण दुरध्वनी 02433-223051 | कार्यालयीन कर्मचारी |
| | **एकुण 25 सदस्य** | |

**जिल्हा नियंत्रण कक्षात चार अंकी सांकेतांक (1077) बाबत:-**

जिल्हा नियंत्रण कक्षात चार अंकी **1077 टोल फ्री क्रमांक औरंगाबाद जिल्हयातुन बीएसएनएलच्या फक्त लँड लाईन वरुन लावता येते.** इतर दुरध्वनी वरुन 2331077 लावण्यात यावे.

## मेडीसीन्स/मेडीकल टिम :-

1. 2009 मान्सून पुर्व तयारी म्हणुन - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,(घाटी) येथील 20 खाट, सर्व औषधी उपकरणे, प्राणवायू, तज्ञ डॉक्टर्स, (सर्जन, फिजिशियन, अनेस्थेटिस्ट ) इत्यादी सेवा 24 तास उपलब्ध आहेत. अपघात विभागत वैद्यकीय अधिकारी व डी.एम.ओ 24 तास कार्यान्वित असतात. आपत्ती दरम्यान अपघात विभागात सायरनची व्यवस्था करण्यात आली आहे. रुग्णवाहिका उपलब्ध आहे. जीवनावश्यक औषधी उपलब्ध करुन ठेवण्यात येतील.
2. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,(घ्ंाटी) येथे आपत्ती साठी 24 तास कंट्रोल रुम कार्यान्वित राहणार असून दुरध्वनी क्र 2402409 आसा आहे.
3. जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे नेतृत्वाखाली सामान्य रुग्णालय. 2331019
4. जिल्हा आरोग्य अधिकारी 2350744
5. इंडियन मेडीकल असोसिएशन, औरंगाबाद-
6. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रक्त पेढी , (घाटी), औरंगाबाद 2334411-17
7. कमल नयन बजाज हॉस्पीटल, रक्त पेढी , सातारा परिसर, औरंगाबाद 2334447
8. एम.जी.एम हॉस्पीटल, रक्त पेढी, सिडको परिसर, औरंगाबाद 2484693
9. लोकमान्य रक्त पेढी , औरंगाबाद 2335516
10. दत्ताजी भाले रक्त पेढी , औरंगाबाद 2352371

## पशु वैदयकिय सेवा (Veterinary Services) :-

1. जिल्हा पशु वैदयकिय कार्यालय, खडकेश्वर, औरंगाबाद

## हेल्थ ॲन्ड सॅनिटेशन :-

1. इंडियन मेडीकल असोसिएशन औरंगाबाद
2. महानगर पालीका कर्मचारी संघ, औरंगाबाद
3. सफाई कामगार संघ, महानगर पालीका, औरंगाबाद
4. नगर पालीका, पैठण
5. नगर पालीका, वैजापूर
6. नगर पालीका, गंगापूर

## अस्थाई आश्रयस्थान (Temporary Shelter) :-

1. कॉन्ट्रक्टर असोसिएशन औरंगाबाद
2. रोटरी क्लब, औरंगाबाद
3. रोटरी क्लब,पैठण
4. औरंगाबाद व्यापारी मंडळ, औरंगाबाद
5. लायन्स क्लब, औरंगाबाद

## औरंगाबाद जिल्हयातील अशासकीय सेवाभावी संस्थांची यादी :-

1. लायन्स क्लब (मुख्य), बजरंग चौक, औरंगाबाद 2482153/2482973
2. लायन्स क्लब (केंद्र), चिंतामणी कॉलनी , औरंगाबाद 2331854/2333856
3. लायन्स क्लब, मिड टॉउन, गादीया पार्क, औरंगाबाद 2332851-52
4. लायन्सक्लब एन-3, सिडको, चिकलठाणा, औरंगाबाद 2482564/2482032/2482034
5. लायन्स क्लब सिडको एन-4, औरंगाबाद 2486492/2332136
6. वाळुज लायन्स क्लब, भागवती कॉलनी, औरंगाबाद 2333631/2333715
7. राटॅक्ट कल्ब ऑफ औरंगाबाद, 5-त्रिमुर्ती कॉम्पलेक्स, जवाहर कॉलनी, औरंगाबाद 2334431
8. राटॅक्ट कल्ब ऑफ मिड टॉउन, विश्वास अजित, उस्मानपुरा, औरंगाबाद 2331652
9. राटॅक्ट कल्ब ऑफ औरंगाबाद (मुख्य), देवदर पळनीटकर श्रीफळ, भाग्यनगर, औरंगाबाद 2332475
10. रोटरी कल्ब ऑफ औरंगाबाद, मिड टॉउन, जगन्नाथ मंडलिक, औरंगाबाद 2337795
11. मानव विकास प्रकल्प, श्री अंकुश भालेराव, अदालत रोड, औरंगाबाद
12. जैटंस ग्रुप, बन्सीलालनगर, औरंगाबाद 2331788 /2339199
13. जैटंस ग्रुप, चिकलठाणा, श्री मोहन कोठारी, औरंगाबाद 2485671/2485659
14. जैटंस ग्रुप, वाळुज, औरंगाबाद 2564145 / 2334365
15. भारतीय किसान संघ, 47-केशव कृपा, पन्नालालनगर, औरंगाबाद 2329089
16. डोनरस कल्ब, अरीहंत नगर, औरंगाबाद 2326364
17. सावली, प्रणव 12, भाग्यनगर, अदालत रोड, औरंगाबाद 2333620
18. सिनेमा थेटर असोसिएशन, औरंगाबाद 2332211
19. श्री मिठावाला,सचिव,रेडक्रॉस सोसायटी, एम-17, सहाय्यादरी हिल, बागडीया नगर, गारखेडा, औरंगाबाद 9881107071 2405566
20. सेंटर फॉर डेव्हलपमेंट ॲग्रीकल्चर इन मराठवाडा, (सिडॉम), एन-11, जी-16/3, दिपनगर, हडको, औरंगाबाद 9850057971 / 9421346544
21. वाटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट (वोटर) पर्यावरण मार्केट यार्ड जवळ औरंगाबाद 0240-2486576
22. गायत्री बाल विकास सेवाभावी सस्था, विष्णुनगर, जवाहर कॉलनी, आकाशवाणीच्या पाठीमागे, औरंगाबाद 9822638664 240-2327805
23. लोकेश्वरी विविध अभियंते बेरोजगार सेवा सहकारी संस्था,, औरंगाबाद 0240-2321027 / 9822638664
24. दिलासा जनविकास प्रतिष्ठान, बी-3, सुदर्शन पार्क, MIDC कार्यालय समोर, वेदांतनगर, औरंगाबाद 0240-2363741 /9822059883
25. जय हनुमान ग्रामिण बहुउदेशीय शिक्षक प्रसारक मंडळ, आडगांव बु, ता औरंगाबाद 9822208843
26. संकल्प बहुउद्येशीय विकास संस्था, प्लॉट न एच-9, फैजनगर, बॅरीबाग, हर्सुल, औरंगाबाद 9921153680
27. पंचकृष्ण बहुउद्येशीय सेवाभावी संस्था, वरझडी, ता औरंगाबाद 9922442064
28. उत्कृष्ठ सेवाभावी संस्था, औरंगाबाद 9890546411
29. महादजी शिंदे संस्था, औरंगाबाद 9823264954 / 9890829098
30. सत्यशोधक संस्था, औरंगाबाद 02435-229303 / 9421332059
31. श्री लक्ष्मी कृषी व ग्रामीण विकास संस्था, मु पो पिशोर ता कन्नड 9422212995
32. हरी ओम स्वा.सा.सुशिक्षीत बेरोजगार सेवा सह संस्था म घारदोन ता जि औरंगाबाद 9763778952 / 2100588
33. श्री वर्धमान श्वेतांबर स्थानकवासी जैन श्रावक संघ महावीर भवन, आचार्य आनंदऋषीजी महाराज मार्ग कुंभारवाडा, औरंगाबाद 2351701 /2337539
34. बाबुराव काळे शिक्षण प्रसारक मंडळ, समर्थनगर औरंगाबाद 9422707069
35. श्री ओसवाल जैन ट्रस्ट जाफर गेट, औरंगाबाद 9422205434 / 2320118

## जिल्हा पातळीवरील अधिका-                यांसाठी
## आपत्कालीन मार्गदर्शक सूचना

### जिल्हा परिषद :-

१. जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील पाझर तलाव व गाव तलाव यांची तपासणी करणे.
२. तलावाच्या भिंती नादुरुस्त असल्यास किंवा भिंतीला भेगा पडलेल्या असल्यास त्याची तात्काळ दुरुस्ती करावी.
३. तपासणी पथकांनी तपासलेल्या तलावंची तपासणी व दुरुस्ती केल्याबाबतचे प्रमाणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे.
४. प्रत्येक पाझर तलावांचे ठिकाणी संपर्क अधिकारी नियुक्त करुन त्यांचे नाव व पदनाम, कार्यालय व निवास दुरध्वनी व मोबाईल क्रमांक जिल्हाधिकारी कार्यालयास कळविण्यात यावे.
५. नैसर्गिक आपत्तीच्या काळात सर्व ग्रामसेवकांना मुख्यालयास उपस्थित रहाणे व मुख्यालय न सोडण्याचे सुचना देणे.
६. जि.प.सिचन विभागाने यावर्षी घळभरणी झालेल्या पाझर तलावांची तालुका निहाय माहीती या कार्यालयाकडे सादर करावी.

### सार्वजनिक बांधकाम विभाग :-

१.रस्ते व पुल कमकुवत झाले असल्यास त्यांची तपासणी करुन तात्काळ योग्यती दुरुस्ती करुन घेणे.
२.रस्त्याची व पुलांची कामे अर्धवट झालेली असल्यास ती तातडीने पुर्ण करुन घेण्यात यावी.
३.संभाव्य आपत्तीच्या कालावाधीत आपदग्रस्तांच्या निवाऱ्यासाठी आवश्यकती मदत जिल्हा प्रशासनास करण्यात यावी.
४.आपत्तीच्या काळात आपदग्रस्त गावांना किंवा पुरपरिस्थित पर्यायी रस्तेची व्यवस्था करणे बाबत जिल्हा प्रशासनाला मदत करणे.
५.आपले विभागाचा कृती आराखडा सादर करावे.

### नगर पालीका /महानगर पालीका :-

१.आपत्तीच्या काळात कार्यालयात नियंत्रण कक्ष ठेवावे.
२.नगरपालीका व महानगर पालीका हद्दीत जुन्या व जिर्ण झालेल्या इमारतीचा आढावा घेवुन आवश्यकते प्रमाणे इमारत रिकाम्या करुन घेण्याची कार्यवाही करणे.
३.गटारे व नाल्यांची साफसफाई करणे.
४.शहरातुन जाणारे नद्या व नाल्याचे किनार पटटीवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेणे.
५.उघडी गटारे बंद करण्याची कार्यवाही पावसाळ्या पुर्वीच करणे.
६.संभाव्य आपत्ती कालावाधीत आपदग्रस्तांना निवाऱ्याची जागा निश्चित करणे. जिल्हा प्रशासनास मदत करणे.
७.आरोग्य विषयक शहरातील शासकीय, खाजगी रुग्णालयाची अद्यावत यादी तयार करणे, त्यांचेकडे आलेली सोय सुविधा, खाटांची संख्या, रुग्णवाहिका, दुरध्वनी क्रमांक अद्यावत यादी करुन यादी जिल्हा नियंत्रण कक्षात द्यावी व जिल्हा नियंत्रण कक्षासोबत नेहमी संपर्कात रहावे. तसेच आरोग्य विषयक सुचना असलेली भितीपत्रके लावणे.
८.तहसिलस्तरावर तहसिलदार व मुख्याधिकारी यांनी प्रभावी समन्वये करुन उपाययोजना करावे.
९.पिण्याचे पाण्यामध्ये ब्लिचींग पावडरचा वापर करुन शहरास शुध्द पाणी पुरवठा करण्याची कार्यवाही करावी आपत्कालीन कृती आराखडा या कार्यालयास सादर करावा.

## कृषी विभाग :-

१.अतिवृष्टी नैसर्गिक आपत्तीमध्ये होणा-या पिकांच्या नुकसानीबाबत तातडीने पंचनामे करणे, नुकसानीचे सर्वेक्षण करणे. तसेच पिकांचे मुल्यांकन करणे, पिकांचे व जमीनीच्या नुकसानीची माहिती तयार करणे.

२.कृषी विभागाने आवश्यक काळजी घ्यावी व जिल्हा प्रशासनास तात्काळ माहिती द्यावी.

३.आपत्कालीन व्यवसथापन कृती आराखडा या कार्यालयास सादर करावा.

## महसूल विभाग :-

१.उप विभागीय स्तरावर उप विभागीय अधिकारी व तालुकास्तरावर तहसिलदार हे समन्वय अधिकारी राहतील. त्यांनी आपल्या कार्यालयात २४ तास नियंत्रण कक्ष कायम करावे.

२.नदी काठच्या व अतिवृष्टीमुळे धोका असलेल्या गांवाची अद्यावत यादी तयार करणे व अशा सर्व गांवाना भेटी द्याव्यात.

३.ज्या गावात संभाव्य धोका पोहोचतो अशा गांवाची माहिती घेवुन आवश्यक तेव्हा येथील लोकांना सुरक्षित स्थळी स्थालांतरित होण्यास सांगणे.

४.ग्रामसेवक, सरपंच व तलाठी यांच्या बैठक घेउन अशा आपदग्रस्तांना लेखी सूचना द्याव्यात. आपदग्रस्त होणा-या गावांची यादी तयार करुन तेथील लोकांना स्थलांतरित करावयाच्या ठिकाणाची यादी करावी जसे समाज मंदीर, शाळा, दवाखने किंवा जवळचे गाव इत्यादी, येथील दुरध्वनी क्रमांक संपर्क अधिकारी यांची नांवे इत्यादी माहिती देणे व आपल्या नियंत्रण कक्षात एक यादी ठेवणे.

५.उप विभागीय अधिकारी यांनी सहकारी संस्था व फिशरमेन यांची बैठक करुन country boats with boatment आपत्तकालीन वेळेस योग्य दरात उपलब्ध होतील अशी चर्चा करावी.

६.तसेच अशा ठिकाणी अन्न धान्याचा पुरेसा साठा असेल याची खात्री करणे. पर्जन्यमापक यंत्रे सुस्थितीत असल्याची खात्री करणे. नादुरुस्त असल्यास आपल्या स्तरावर दुरुस्त करुन घेणे,

७.जिवित, वित्त व प्राणहानी झाल्यास अशा व्यक्तींना तात्काळ मदत देणेसाठी आवश्यक ती कार्यवाही करणे.

८.सर्व तहसिलदार यांनी नैसर्गिक आपत्तीचे काळात तालुका यंत्रणेचे समन्वये ठेवण्याचे काम करावे. तालुका स्तरावर नैसर्गिक आपत्तीमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोना करण्यासाठी एक समिती स्थापन करावी व सदर समितीची बैठक घेण्यात येवुन तालुका स्तरावर सर्व विभागांना आवश्यक त्या सुचना देण्यात याव्यात.

९.तसेच अतिवृष्टी किंवा इतर कारणामुळे संभाव्य पुरामुळे धोका निर्माण होण्याची शक्यता असलेली गांवे तालुकास्तरावर निश्चित करुन अशा गावांची यादी तात्काळ जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावे.

१०.त्याचप्रमाणे तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात पुर, भूकंप व अन्य नैसर्गिक आपत्तीमध्ये धोक्याची स्थळे निश्चित करुन नकाशासह या कार्यालयास माहिती सादर करावे.

या शिवाय खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

१. नैसर्गिक आपत्ती झालेलया नुकसानी बाबत जिल्हाधिकारी यांना २४ तासात प्राथमिक अहवाल सादर करणे बाबत तालुकास्तरावर तलाठी व मंडळ अधिकारी यांना सुचना देणे. तसेच जिवित हानी बाबतचा अहवाल विहित प्रपत्र १ व २ दर महिन्याचा ५ तारखेपर्यत सादर करणे.

२. नैसर्गिक आपत्तीत झालेल्या नुकसानी बाबत व आपदग्रस्तांना दिलेल्या मदतीबाबत १ जून पासून दर गुरुवारी साप्ताहिक अहवाल शासनास सादर करावा लागतो. साप्ताहिक अहवाल दर गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे

३. पर्जन्यमानाचा दररोजचा अहवाल सकाळी ८.०० वाजता न चुकता जिल्हाधिकारी कार्यालयास देणे

४. आपल्या तालुकयात कापड, लहान मुलांसह, टेन्ट, टारपोलीन, जीसीआय शिट, बोटस, लाईफ जॉकेट, मोबाईल वाटर टॅंकर, कॅन्वस वाटर टॅंकर, ड्रम, ट्रान्सपोर्टींग ड्रिकींग वाटर बकेटस, सॅंडबेगसचा योग्य साठा उपलबध आहे का याची खात्री करुन घ्यावे

५. जिल्हयातील अनेक ग्रामपंचातीत BPT फोन सुस्थित सुरु आहे का याबाबतची खात्री गटविकास अधिकारी यांचेकडुन करुन घ्यावी काही त्रुटी असल्यास गटविकास अधिकारी यांनी दुरध्वनी विभाग यांचीशी संपर्क साधुन BPT फोन सुरु करावे

## पुरवठा विभाग :-

१.जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी आपदग्रस्त भागात अन्न धान्य व रॉकेलचा साठयाची तपासणी करुन ठेवावी आणि तहसिलदार यांचे मदतीने आपदग्रस्तांना अन्न धान्य व रॉकेलचा पुरवठा वेळेवर होईल यांची दक्षता घ्यावी.
२.त्याच प्रमाणे आपदग्रस्त भागात डीलर्स यांचेकडे जीवन आवश्यक वस्तु म्हणजे, Pulses, edible oil, salt, kerosene, coal, milk power, babyfood, matches, candles याचा साठा योगय आहे का, मान्सुन सुरु होण्यापुवीर्‌ याची खात्री करुन घ्यावा.
३.कंझ्युमर को ऑप सोसायटी यांना उपरोक्त जिवन आवश्यक वस्तुचा साठा ठेवणे बाबत आपले स्तरावर कळवावे.
४ जिल्हा नियंत्रण कक्षास आपत्तकालीन व्यवस्थापन अद्यायावत आराखडा सादर करावा.

## महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनी :-

१ नैसर्गिक आपत्तीच्या कालावधीत विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास तो तात्काळ सुरुळीत सुरु होईल याची दक्षता घ्यावी.
२ जिल्हयातील १३२ के. व्ही. स्टेशन व ३३ के.व्ही. सबस्टेशनची तालुका निहाय आकडेवारी या कार्यालयास सादर करावी.
३ औद्योगिक, कृषी, घरगुती व व्यापारी विभागात होणा-या विद्युत वापराबाबतची या वर्षाची सरासरी आकडेवारी या कार्यालयास सादर करण्यात यावी.
४ संभाव्य नैसर्गिक आपत्तीच्या निवारण बाबत कृती आराखडा विहित नमुन्यात प्रपत्र जिल्हा नियंत्रण कक्षाकडे सादर करावा.

## पाटबंधारे विभाग :-

१.जायकवाडी धरणातून गेल्यावर्षी पाणी सोडतांना जिल्हा प्रशासन आणि पाटबंधारे विभागात चांगला समन्वय होता त्यामुळे मोठया प्रमाणात वित्त व मनुष्य हानी टाळता आली. तेव्हा याही वर्षी अशा परिस्थितीत योगय समन्वये ठेवुन पाणी सोडण्याचे नियोजन करावे असे सुचना दिले.

२.त्याच प्रमाणे नैसर्गिक आपत्तीच्या काळात नोडल ऑफीसरची नेमणुक करावी.
३.जिल्हयातील सर्व लघु सिंचन व मध्यम प्रकल्पाची अद्यावत माहिती ठेवण्यात यावी. आवश्यक ती डागडूजी पावसाळयापुर्वी करुन घेण्यात यावी.
४.प्रत्येक प्रकल्पावर जबाबदार अधिका-याची नेमणुक करुन नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात यावे.
५.त्याच प्रमाणे जायकवाडी पैठण धरणाच्या पाण्याची पातळीची माहिती दररोज या कार्यालयास कळविण्यात यावे. शक्य असेल तर आपले विभागाचा एक बिनतारी संदेश यंत्र किंवा वाकी टाकी दिनांक १ जुन पासुन जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय येथे लावण्यात यावा. म्हणजे अतिवृष्टीमुळे पुर परिस्थीती निमार्ण झाल्यास वेळीच उपाययोजना करण्यास सुलभ राहील.
६.अतिवृष्टी झाल्यास कोणत्याही लहान मोठया धरणातील पाणी पुढील पात्रात सोडण्याची कार्यवाही करण्यापुर्वी संबधित महसुल यंत्रणेतील अधिका-यांस प्रत्यक्ष संपर्क साधून कळविण्यात यावी.
७.धरणातील पाण्याची पातळी व पाणी धरणाच्या दरवाज्यातून पुढील पात्रात पाणी सोडण्यासाठी ठरविण्यात आलेल्या निकषाबाबत नव्याने वैज्ञानिक दृष्टीकोणातून तपासणी केल्यास धरणामध्ये पावसाळयात अधिक पाणी साठविता येईल तसेच पावसाळयानंतर या पाण्याचा उपयोग येउ शकेल, अशी योजना करावी.

## दुरध्वनी खाते :-

१.नैसर्गिक आपत्ती काळात सर्व महवाचे दुरध्वनी व मोबाईल सेवा सुरु राहतील याची दक्षता घेणे. जेणेकरुन आपदग्रस्त गांवाना तात्काळ दुरध्वनी व मोबाईलद्वारे संपर्क सोईचे होईल.
२.ज्या गांवाना संभाव्य धोका आहे त्या ठिकाणचे दुरध्वनी व मोबाईल व्यवस्था सुरळीत चालु आहे का, तहसिलदार यानी खात्री करावी व दुरध्वनी खात्यांनी तहसिलदार यांना आवश्यक ती मदत करावी. ३.नैसर्गिक आपत्ती कालावधीत दळणवळणासाठी दुरध्वनी व मोबाईल हे साधन अनिर्वाय असते त्यामुळे सदर सुविधा कोणतयाही परिस्थितीत खंडीत होणार नाही याची दक्षता घेणे. विशेषत: धोक्याचे गांवाना S.T. Sets, W.T. Sets उपलब्ध करुन द्यावे.
४.आपत्कालीन व्यवस्थापन आराखडयाचे माहिती सादर करावी.
५.जिल्हयातील ग्रामपंचायत येथील BPT फोन सुस्थित सुरु करावे असे सुचना देण्यात आले.

## अग्निशमन विभाग :-

१.महानगर पालिका / नगर पालीका यांचेकडे उपलब्ध असलेली अग्निशमन वाहने सुस्थित ठेवावी व आवश्यक्ते मागणी नुसार तात्काळ पुरविण्यात यावी.
२.तसेच शहर आणि ग्रामिण भागातील शासकिय व खाजगी अग्निशमनदल, पाणी टँकर याची अद्यावत माहिती जिल्हाधिकारी कार्यालय आपत्तकालीन जिल्हा नियंत्रण कक्ष यांचे कडे सादर करावी.

## पोलीस विभाग :-

१.आपदग्रस्त काळात आपत्तीच्या ठिकाणी पोलीस बंदोबसत आवश्यक आहे. त्या ठिकाणी पोलीस बंदोबसत देणे बाबत योग्यती कार्यवाही करणे.
२.नैसर्गिक आपत्तीच्या कालावधीसाठी आपले विभागाचे एक नोडल ऑफीसरची नियुक्ती करावी.
३.विभागाचा आपत्कालीन व्यवसथापन आराखडा तयार करुन याची एक प्रत सादर करावी.

## होमगार्ड :-

१.जिल्हा समादेशक होमगार्ड यांनी जिल्हयातील सर्व होमगार्डची अद्ययावत यादी ठेवावी. त्यांची संख्या इत्यादी माहिती जिल्हा आपत्कालीन नियंत्रण कक्षाकडे सादर करावे.
२.होमगार्ड यांना पुर परिस्थीतीला तोंड देण्यासाठी त्यांना प्रशिक्षण द्यावे. नैसर्गिक आपत्तीच्या काळात पोलीस खाते व जिल्हा प्रशासने आवश्यकतेनुसार होमगार्डस शार्ट नोटीसवर पुरविण्याची व्यवस्था ठेवावी.
३.आपदग्रस्तांना फर्सटएड कसा करता येईल याचाही प्रशिक्षण द्यावे.

## जिल्हा माहिती अधिकारी :-

१.हवामान खात्याशी नेहमी संपर्कात राहावे. वेळोवेळी माहिती प्राप्त करुन घ्यावी.
२.मोसमी पावसाळयाचे कालावधीत प्राप्त होणा-या हवामान विषयक संदेशांना जनतेच्या माहितीसाठी वर्तमानपत्रातून प्रसिध्दी द्यावी.
३.सावधगिरीच्या उपाययोजना, नैसर्गिक आपत्तीमधील मदत कार्याबाबत लोकजागृतीसाठी प्रसिध्द माध्यमांना माहिती पुरवावी.
४.नैसर्गिक आपत्ती संबधी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेलया वृत्तांची कात्रणे नियमीत जिल्हा प्रशासनाकडे सादर करावी.

## परिवहन विभाग :-

१.प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांनी आपदग्रस्त कालावधीत मदत व पुनर्वसन करण्याचे कामी वाहनांची गरज असल्यास जिल्हा प्रशासनाला वाहने पुरविणे बाबत तात्काळ कार्यवाही करावी.
२.त्याच प्रमाणे वाहतूक करण्यासाठी योग्य दरात वाहने उपलब्ध होतील अशी व्यवस्था करावी.
३ परिवहन विभागाचे आपत्कालीन व्यवस्थापन आराखडा तयार करुन सादर करावी.

## आरोग्य विभाग :-

१ जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी ग्रामिण तर जिल्हा शल्य चिकित्सक यांनी शहरी भागासाठी आपदग्रसतांना आवश्यक्त ती वैद्यकीय मदत तातडीने देण्याबाबतची कृती आराखडा तयार करुन वेळोवेळी आवश्यकतेनुसार कार्यवाही करावी.
२.नैसर्गिक आपत्तीनंतर उद्‌भवणा-या संसर्गजन्य/ साथीच्या रोगाच्या नियंत्रणासाठी सर्व आवश्यकती उपाययोजना करावी व तातडीने लागणा-या औषधाचा साठा जसे, Vaccines, disinfectants, first-aid kit, जिल्हा, उपविभाग व तहसिल स्थरावर उपलब्ध ठेवावा.
३.पुरपरिस्थितीत आपदग्रस्त गांवाना आवश्क्तेनुसार Primary Health Centre सुरु करण्याची तयारी ठेवावी. या सेटरमध्ये Chlorin, liquid, water purifying tablets, phyny/cresol, harrocks bones & Chloroscrops चा साठा गरजेनुसार उपलब्ध करुन द्यावे.
४.त्याच प्रमाणे अति आवश्यक मोबाईल टिम ठेवावा जे स्थलांतरित लोकांचे कॅम्पमध्ये भेट देतील. या मोबाईल टिम सोबत anti-dirrhials, anti-biotics, chemothera peutics and anti-malaria drugs, anti-phretics, analgesis, paediatar formulations for treatment of Gastro, internal respiratory infections in children जसे रोगाचे उपचारासाठी आवश्यकती medicines ची व्यवस्था करुन ठेवावी. विशेषत: लहान मुलावर देखरेख ठेवावे.
५.त्याच प्रमाणे Ist aid मध्ये Splints including thoms splints, tourniguest, dressing & assorted bandages, anit-spatic cream, scissors and safety pins उपलब्ध करुन द्यावे.
६.जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी वेळोवेळी पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासुन आवश्क ती कार्यवाही करावी व त्याबाबतचा कृती आराखडा सादर करावे.

# 1. तहसीलदार

**अ) आपत्ती पूर्व नियोजन-**

1) तालुकास्तरीय अधिकारी यांच्याशी सल्लामसलत करुन एकत्रित तालुका आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करावी. अशी योजना करतेवेळी खालील नमूद बाबींचा अंतर्भाव करावा.

अ) तालुक्यामधील आपत्कालीन प्रदेशाचा नकाशा, तालुक्याचा इतिहास, भौगोलिक परिस्थिती, व्यावसायिक तपशिल, पर्जन्यमान, जलसिंचन आणि कारखाने इत्यादी बाबत तपशिल.

ब) सुरक्षित पर्यायी व्यवस्था ( आपत्ती व्यवस्थापन योजना राबविण्यासाठी)

क) कार्यालयाचे कार्यालय प्रमुख,कार्यालयीन कर्मचारी वर्ग,कार्यालयीन वाहन,कार्यालयीन इमारती उपलब्धता.

ड) नियंत्रण कक्षामधील तपशीलवार व्यवस्था.

फ) भौगोलिक विभाग, प्रादेशिक अधिकारी कार्यालय आणि तहसील कार्यालय,आपत्ती व्यवस्थापन कार्यालय, इतर तालुका स्तरीय अधिकारी कर्मचा-यांनी नेमून दिलेले काम वेळेत व तत्परतेने करणे.

ग) तालुक्यामधील अन्नधान्य एकत्रित करुन ठेवण्याच्या ठिकाणाची/गोदामांची आणि स्वस्त धान्य दुकानाची सविस्तर माहिती.

ह) तालुक्यामधील संकटकालीन मार्गातून सुटका करण्यासाठी वाहने, आणि इतर साहित्यासंबधी विस्ताराने माहिती.

ज) तालुक्यामधील एका गावातून दुस-या गावी संदेश पाठविण्यासाठी असणारी साधनाची तपशीलवार नोंद.

ई) तालुका आपत्ती व्यवस्थापन मंडळाचे कामकाज चालविण्यासाठी विस्ताराने तपशिलवार माहिती.

क) एन.जी.ओ.आणि त्यांचे मदतनीस त्यांचे पत्ते आणि तालुक्यातील त्यांचे दुरध्वनी क्रमांक.

ख) तालुका पातळीवरील अधिका-यांना परिस्थितीची जाणीव करुन देण्याचे प्रशिक्षण देणे आणि त्यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी विभागाची स्थापना.

म) नियंत्रण कक्षाचा नियंत्रक म्हणून निर्णय क्षमता असलेल्या सक्षम अधिका-याची खास नियुक्ती करणे.

न) धोक्याचे पृथक्करण सूक्ष्म अभ्यास,ऋतु/मौसम,संभाव्य आपत्ती आणि ऐतीहासिक आपत्तीचा पुनर्विचार.

व)आपत्तींची शक्यता असलेल्या भागाचा पुनर्विचार भय/जोखीम,प्रतिबंधक उपाय,तरणोपाय,तरणोपायाची उपयुक्तता आणि जरुर त्या गोष्टीचा पुरवठा.

2) गांव आपत्ती व्यवस्थापन आराखडा व तालुका आपत्ती व्यवस्थापन आराखडा यांचे अद्ययावतीकरण करणे.

3) गावच्या भेटीदरम्यान ग्राम आपत्कालीन योजनेअंतर्गत प्रत्येक गावात सुरक्षित निवा-याच्या इमारती/जागांचे निरीक्षण करणे आणि गरज भासल्यास त्यात स्थानिक अधिकारी,उपलब्ध आर्थिक तरतूद आणि स्वंयसेवी संस्था यांच्या मार्फत दुरुस्ती कणे.

**धोक्याची किंवा आपत्तीची सुचना मिळताच-**

1) तालुका आपत्ती व्यवस्थापन प्रमुख (उपजिल्हाधिकारी किंवा तहसीलदार) यांनी भरविलेलया बैठकित धोक्याच्या परिस्थिती विषयी सचेतन करणे.

2) आपत्कालीन परिस्थितीत कोणत्या अधिका-याने कोणते काम करावयाचे याची योजना तयार करणे.

3) विविध विभागाच्या अधिका-याचा गट तयार करणे.

4)आपत्तीच्या शक्यतेविषयी तो कृती दलाला सचेतन व कार्यशील बनवेल व आपत्तीची सुचना, वेळेवर पोहचवण्यासाठी दळणवळण विषयी सचेतन करेल आणि आपत्कालीन कृती दलाचे सदस्य सरपंच,तलाठी,मुख्याध्यापक यांना ताबडतोब आणि वेळेत सूचना देण्याविषयी तत्पर राहणे.

5) तालुका पातळीवरील सर्व कर्मचा-यांना आपल्या मुख्यालयात राहण्याविषयीचे आदेश देणे.

6) गांव पातळीवरील सर्व कर्मचा-यांना त्यांच्या -त्यांच्या मुख्यालयाच्या जागेवर राहण्याच्या सूचना देणे.

7) अतिसंवेदनशील क्षेत्रामध्ये सूचना देण्यासाठी लाऊड स्पीकर असलेली वाहने पाठविणे.

8) त्याव्दारे नदीकिनारी,खोलगट भागात,आर्थिक दृष्टया मागासवर्गीय कुटूंब त्याचसोबत निराधार,निराश्रीत कुटूंबाना आपत्तीचा धोका संभवणा-या कुंटूबांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करणे.

9) झोनल किंवा सबझोनल अधिका-यांना त्या भागामध्ये शोध,सूटका कार्य, स्थलांतर आणि मदत कार्यासाठी त्यांच्या त्यांच्या तालुका आपत्ती व्यवस्थापन आराखडा किंवा गांव आपत्ती व्यवस्थापन आराखडा नूसार योग्य मोजणी मार्गावरुन आपत्तीग्रस्त भागात पाठवणे.

10) शोध आणि सुटका कार्य लोकांचे स्थलांतर आणि मानवी संसाधनाच्या उपयोगितेची रचना करुन गरजेनुसार त्याचा विनियोग करेल यासाठी तो आपत्ती व्यवस्थापन संघ आणि स्थानिक वसाहतीतील लोकाची झोनल ऑफीसरच्या व्दारे मदत घेणे.

11)पूर्वसूचना दिल्या गेल्यामुळे ज्या लोकाचे स्थलांतर केले गेले आहे अशा लोकांच्या तात्पुरत्या निवा-यांची सोय करणे.

12) आवश्यकतेनुसार तो लोकांना सुरक्षित ठिकणी हलविण्यासाठी वाहनांची उपलब्धता करुन देणे.

13) तात्पुरत्या निवा-यामध्ये आणि रिलीफ कॅम्पमध्ये स्थानिक NGO डॉक्टर आणि औद्योगिक वसाहतीच्या मदतीने अन्नपाणी व औषधाची सोय करणे.

14) स्थानिक NGO च्या औद्योगिक वसाहतीच्या आणि देणगीदारांच्या मदतीने वेळे आधिच मदत कार्याची योजना करणे.

## आपत्ती नंतरचे कार्य-

1) आपत्तीमुळे वाताहत झालेले क्षेत्र व गावक-यांना इतरांपासुन वेगळे करणे आपत्ती व्यवस्थापन संघाना कृतीशील बनवणे.

2)आणिबाणीच्या मदत कार्याची विभागणी करुन मदतकार्य सुरु करुन त्याचबरोबर नुकसानीचे मुल्यमापन क्रुन त्याविषयीची धोरणात्मक योजना तयार करणे. त्याचबरोबर त्यासंबधीचे आराखडे/तक्ते तयार करुन सर्व कर्मचा-यांना समजावून सांगणे.

3) सरकारचे धोरण व आपत्तीकालीन मदतकार्य यासंबधीचे मार्गदर्शन सर्व गटातील सभासदांना करणे.

4) त्याचबरोबर सरकारी मदत निधी व वस्तुंचे वाहतुक आणि वाटप यासंबधीची तालुका पातळीवर व ग्रामपातळीवर पारदर्शक रचना करणे.

5) मदतकार्य व वस्तू वाटपामध्ये कुठल्याही प्रकारची अनिष्ट गोष्ट घडणार नाही याची काळजी घेणे. ज्यायोगे गरजू लोक त्यापासुन वंचित राहणारनाहीत याची दक्षता घेता येईल.

6) आवश्यकतेनुसार मदतकार्य शिबीरामध्ये पिण्याचे पाणी व अन्य आवश्यक वस्तुंची उपलब्धता करुन देणे.

7) वाताहतीचे प्रथमिक अंदाज तयार करणे.

8) जिल्हा प्रशासन आणि नियंत्रण कक्षाला वाताहतीची अचूक माहिती पुरवणे.

9) सकटग्रस्त लोकांच्या सूटकेचे कार्य आपत्ती व्यवस्थापन संघ प्रशिक्षीत पोलीस,जलतरण पट इत्यादींच्या सहाय्याने गरजेनुसार हाती घेणे.

10) मदतकार्य आणि लोकांना जवळच्या किंवा तात्पुरत्या किंवा कायमच्या दवाखान्यात उपचारासाठी लविण्यासाठी जास्तीत जास्त वाहनाची उपलब्धता करणे. यासाठी डी.एम.टी., एन.सी.सी., स्थानिक पोलीस व्हॅनस,मिल्ट्री फोर्स इ.ची मदत घेणे आपत्तीमध्ये जे लोकमृत पावले आहेत. त्यांची ओळख पटविणे त्याचबरोबर कायदेशिर बाबींची पूर्तता होईपर्यंत त्यांचे संरक्षण करण्याची व्यवस्था करणे.

- वेगवेगळया विभागात असलेल्या तंज्ञ व्यक्तींना ताबडतोब आपत्तीचे सर्वेक्षण करण्यासाठी रवाना करणे.
- आपत्तीनंतर त्या लोकांची पूनर्वसन करण्यासाठी व्यवस्था करणे.

## तालुका पातळीवरील अधिका-यांसाठी आपत्कालीन मार्गदर्शक सूचना

## 2. पोलीस निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक

### अ) आपत्ती पूर्व नियोजन-

तालुक्यात जेथे जेथे एकापेक्षा जास्त पोलीस चौक्या असतील ते पोलीस निरीक्षक,पोलीस उपनिरीक्षक आपत्ती व्यवस्थापन समितीचे काम नोडल अधिका-याप्रमाणे करेल. तालुका पातळीवरील पोलीस खात्यातील लोकांशी स्वतंत्र आणि बहुव्यापक अशी यंत्रणा आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी बनवणे, तसेच आपत्कालीन परिरस्थितीला सामोरे जाण्यासाठी आणखी काही पर्याय तयार करणे.

